प्र ३

# बृहन्मुंबई महानगरपालिका

उप-आयुक्त (परि.-दोन) यांचे कार्यालय, एफ/दक्षिण विभाग कार्यालय, परळ, मुंबई – ४०० ०१२.
क्र. एमडीएफ/ओडी/२८५/जन, दिनांक - ०२.०५.२०१८

विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव – २०१८

संदर्भ :- १. क्र. एमडीएफ/ओडी/६६४/जन, दि. ३०.०५.२०१७

२. क्र. एमडीएफ/ओडी/७२७/जन, दि. १०.०७.२०१७

३.क्र. एमडीएफ/ओडी/४१८/जन, दि.१२.०५.२०१७

सार्वजनिक गणेशोत्सव-२०१८ च्या संदर्भात पुढील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत –

**गणपतीच्या मूर्ती तयार करण्यासाठी तात्पुरते मंडप बांधण्याबाबत :**

१. मंडपाच्या परवानगीबाबत – परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/६६४/जन, दि. ३०.०५.२०१७ अनुसार यावर्षी मंडपाच्या परवानगीचे दर साधारणत: १०% नी वाढविण्यात येतील. याबाबत सर्वसाधारण ३ प्रकारची वर्गवारी करण्यात आली असून, त्यानुसार परवानगीचे दर खालीलप्रमाणे असतील :

| आकारमान | शुल्क |
|---|---|
| ५०० चौ. फुटापर्यंत | - रु. ७९०/- + लागू असलेला जीएसटी |
| ५०० ते १००० चौ. फुटापर्यंत | - रु. १२००/- + लागू असलेला जीएसटी |
| १००० चौ. फुटापेक्षा जास्त | - रु. १५८०/- + लागू असलेला जीएसटी |

२. प्रत्येक मंडपाकरिता अनामत रक्कम रु. ३१७०/- एवढी देय असेल.

३. खाजगी जमिनीवर मालकाच्या परवानगीचे क्षेत्रफळ विचारात न घेता, रु. १५८० /- + लागू असलेला जीएसटी इतके शुल्क आकारुन परवानगी दिली जाईल.

४. विभाग कार्यालयामार्फत मूर्तीकार व मंडपाना परवानगी देताना परिपत्रक क्र. एमडीएफ/४१८/जन, दि.१२.०५.२०१७ मधील तरतूदी विचारात घेण्यात याव्यात.

५. जर काही कारणाने मूर्तीकाराचे घर किंवा मूर्ती बनविण्याच्या जागा प्रकल्पबाधित झाल्यास संदर्भाधीन परिपत्रकातील अटी शर्तींची पूर्तता होत असल्यास नवीन ठिकाणी पूर्वीइतक्याच क्षेत्रफळाची परवानगी देण्यास हरकत नाही.

१२ ५

६. जर जुन्या मूर्तीकाराने अर्ज केला नाही तर त्याच जागेसाठी नवीन मूर्तीकारास प्रथम आलेल्यास प्राधान्य या तत्वाने परवानगी देण्यात येईल. परंतु जागेचे आकारमान आणि एकूण मंडपाची संख्या यात बदल होणार नाही.

७. सार्वजनिक जागेवर मूर्तीकार/मंडपांसाठी नव्याने अर्ज आल्यास विभागीय कार्यालयाकडून परिपत्रक क्र.एमडीएफ/ओडी/४१८/जन दि. १२.०५.२०१७ मधील तरतूदीप्रमाणे तपासणी करण्यात यावी. स्थानिक पोलिस स्टेशन, वाहतूक पोलिस यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त नमूद परिपत्रकातील तरतूदी विचारात घेऊन परिमंडळीय उपायुक्त यांच्या मान्यतेनंतर उचित कार्यवाही करावी. खाजगी जागेवर अशाप्रकारची परवानगी मागणारा मूर्तीकार हा पारंपारिक मूर्तीकार असणे अनिवार्य असेल व त्यास दोन्ही उपनगरांमधून कोणत्याही एकाच ठिकाणी परवानगी देता येईल.

८. मूर्तिकार व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मंडप उभारण्यासाठी रस्ते/फूटपाथवर खड्डे खणू नयेत, अन्यथा नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

९. सदर सूचना नवरात्र व अन्य उत्सवांदरम्यानही लागू राहतील. त्यासाठी स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येणार नाही.

5/5/18

उप-आयुक्त (परि.-दोन)

07/05

अति. आयुक्त (पूर्व उपनगरे)